Vol-13 Special Issue- 1.4 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# "विदर्भाच्या यवतमाळ जिल्हातील प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसाय, पर्यावरण आणि शाश्वत विकास यांचे भौगोलिक व शैक्षणिक अध्ययन."

**डॉ. प्रशांत तुळशिराम शेंडे**
मु. पोस्ट. सायतखर्डा, तह. घाटंजी, जि. यवतमाळ, राज्य. महाराष्ट्र- ४४५३०१.

## सारांश

पर्यावरण आणि शाश्वत विकास ही संकल्पना प्रमुख असून प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसाय म्हणजे शेती, खाणकाम, पशुपालन, मासेमारी असून हा व्यवसाय करत असताना भविष्यात आपल्या कौटुंबिक वारसांना ते मिळाले पाहिजे त्याचा त्यांना उपभोग घेता आला पाहिजे तसेच जीव जंतूंना सुरक्षित ठेऊन. विकास करत राहणे अत्यंत महत्वाचे ठरते. त्या अनुषंगाने प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसाय, पर्यावरण आणि शाश्वत विकास यांचा भौगोलिक व शैक्षणिक अध्ययन. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. यवतमाळ जिल्ह्यात एकूण सोळा तालुके येतात प्रत्येक तालुक्यात कोणता नां कोणता व्यवसाय करतातच. वणी, झरी जामणी आणि मारेगाव या ठिकाणी शेती व्यवसाय कमी प्रमाणात आणि खाणकाम व्यवसाय अधिक प्रमाण असल्याचे प्राथमिक माहितीवरून कळले. तर इतर तालुक्यात शेती आणि त्याला जोड व्यवसाय म्हणून पशुपालन, मासेमारी करतात. बाभूळगाव तालुक्यात मासेमारी हा व्यवसाय करतात. मासेमारी हा यवतमाळ जिल्ह्यात कोलम, परधान लोक करतात. कटला, रोहू असे गोड्या पाण्यातील मासांचे नांवे आहेत. प्राथमिक व्यवसायांतर्गत व्यवसायांचे शैक्षणिक अभ्यासक्रमात माहिती आहे. पण त्यात अधिक भर घालून प्रात्यक्षिक देखील करणे महत्वाचे वाटते. त्यामुळे कौशल्य पूर्ण अभ्यासक्रम होण्यास मदत होऊन, जीवानौपयोगी कौशल्य असल्यास शिक्षण पूर्ण केल्यानंतर कौशल्य आधारित रोजगार प्राप्त होऊन, पर्यावरण आणि शाश्वत विकास होण्यास ही मदत होईल. यवतमाळ सारख्या जिल्ह्यात सामाजिक, आर्थिक, नैतिक, आणि शाश्वत विकस होणे गरजेचे आहे. पर्यावरण चांगले ठेऊन, उत्पादन घेणे, आर्थिक व्यवहार करणे, काळाची गरज आहे. शेती व्यवसायात सुधार करून कमी खर्चात जास्त, उत्पादन कसे करता येईल याकडे लक्ष वेधणे, उदा. ठीम्बक सिंचन, सेंद्रिय शेती, असे नवनवीन प्रयोग करून उत्पादनात वाढ करता येतो. त्यासोबतच पूरक व्यवसायाला देखील प्राधान्य देता येतो; कुक्कुट पालन देखील सोबत करता येतो, पशुपालन, मत्सव्यवसाय यामुळे शाश्वत शेती होण्यास मदत होते. असे जर आपण प्रयत्न केले तर पर्यावरण चांगले राहून, शाश्वत विकास होण्यास मदत होते.

**बीजसंज्ञा** – १.व्यवसाय, २. पर्यावरण, ३. शाश्वत विकास.

## प्रस्तावना –

मानवाला मिळालेल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर केलेली प्रगती ही शाश्वतच असेल असे नाही, म्हणून ती शाश्वतच असायला पाहिजे या हेतूने पर्यावरनाला लक्ष्यात घेऊन मानवाने बुद्धिमत्तेच्या जोरावर विकास केला पाहिजे ते महत्वाचे ठरते. सर्वात महत्वाचा व्यवसाय प्रकारातला व्यवसाय म्हणजे प्राथमिक व्यवसाय होय. प्राथमिक व्यवसायांतर्गत प्रमुख व्यवसाय म्हणजे शेती, खाणकाम, मासेमारी आणि पशुपालन आहे. आतापर्यंत बघितल्यास प्राथमिक व्यवसाय करणारे लोकसंख्या त्यामध्ये युवा, गरीब पुरुष, महिला आणि शेतकरी यांना (अन्नदाते) असेही संबोधले जातात. यवतमाळ जिल्ह्या मध्ये यांचा विचार केला तर आपल्याला सर्वच मागासलेले दिसून येईल म्हणून या हेतूने यांच्यासोबत पर्यावरण आणि शाश्वत विकास होणे गरजेचे आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## व्याख्या –

**व्यवसाय म्हणजे काय ?**

मानव उपलब्ध नैसर्गिक परिस्थितीत विविध कार्य करून आपली उपजीविका करीत असतो. मानवाला उपजीविकेसाठी काही कष्ट करावे लागतात त्यालाच व्यवसाय असे म्हणतात. ( घारपुरे विठ्ठल, २०१३)

**प्राथमिक व्यवसाय –** निसर्गावर अवलंबून असणारे नैसर्गिक संसाधनांचा वापर करून कच्च्या मालाचे उत्पादन, संकलन करणारे व्यवसाय होय.

**पर्यावरण –** जैविक पर्यावरणात अन्न, वनस्पती, प्राणी, आणि त्यातील आंतरक्रिया तसेच अजैविक पर्यावरण यांचा समावेश होतो. या पर्यावरणात मानव हा अत्यंत महत्त्वाचा व प्रभावी घटक आहे. मानवाचे जगणे व त्याचे आरोग्य हे त्याच्या अन्नपदार्थांवर अवलंबून असते. सामाजिक व सांस्कृतिक परिसर हा व्यक्तीच्या जैविक पर्यावरणाचे महत्त्वाचे अंग आहे. (मगर जयकुमार, २०२३)

**शाश्वत विकास –** भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता, वर्तमानातील गरजा पूर्ण करणारा विकास होय.

## उद्दिष्टे –

यवतमाळ जिल्ह्याचे प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसायांचे पर्यावरणाच्या माध्यमातून अभ्यासून शाश्वत विकासाचा आढावा घेणे.

यवतमाळ जिल्ह्याचा पर्यावरण आणि शाश्वत विकास यांचा अभ्यास करणे.

यवतमाळ जिल्ह्यातील प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसाय, पर्यावरण आणि शाश्वत विकास यांची भूमिका अभ्यासणे.

## गृहीतक –


विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसाय, पर्यावरण आणि शाश्वत विकास होण्यास मदत होते. अश्याच व्यवसायात पर्यावरण चांगले राहते.

यवतमाळ जिल्ह्यातील प्राथमिक व्यवसायात बदल झालेला असून त्याचा परिणाम पर्यावरणावर झालेला आहे.

## माहिती स्त्रोत –

हा विषय अभ्यासण्यासाठी संशोधकाने संशोधनाचा दुय्यम पद्धतीचा वापर केला आहे. ज्यामध्ये प्रकाशित लेख, वृत्तपत्रे आणि मासिके इत्यादींच्या माध्यमातून माहिती संकलन करून त्याचा योग्य ठिकाणी लिखाणात वापर केला आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com




नकाशा क्रमांक २.१

**अभ्यास क्षेत्र** – महाराष्ट्रातील विदर्भ प्रदेश हा पूर्वापार आपल्या अनेक गुण वैशिष्ट्यांसाठी प्रसिद्ध असून पश्चिम विदर्भाच्या दक्षिण सीमेवरील यवतमाळ जिल्हा हा एक प्रमुख जिल्हा आहे. या जिल्ह्याचे भौगोलिक स्थान हे भारताच्या जवळजवळ मध्यवर्ती भागात येत असून या जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार हा १९°२६'उत्तर अक्षांश ते २०°४२'उत्तर अक्षांशाच्या दरम्यान तर रेखावृत्तीय विस्तार हा ७७°१८'पूर्व रेखांश ते ७९°९०'पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र हे सुमारे १३६६४ चौ.कि.मी. इतके असून त्याचे प्रमाण हे महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक क्षेत्राशी सुमारे ४.४ टक्के इतके आहे.

**महत्व** – प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसाय, पर्यावरण आणि शाश्वत विकास यांचा भौगोलिक व शैक्षिणिक अध्ययन. प्राथमिक व्यवसाय म्हटले की, शेती हा प्रामुख्याने व्यवसाय डोळ या सामोर येतो , यवतमाळ जिल्ह्यात कापूस पिक प्रामुख्याने घेतला जातो म्हणूनच पांढऱ्या सोन्याचा जिल्ह्या म्हणून ओळखला जातो. भौगोलिक दृष्ट्या विचारात घेतल्यास कापूस पिकासाठी रेगुर मृदा महत्वाची ठरते. आणि ते यवतमाळ जिल्ह्यात जास्त प्रमाणात आढळते. त्यानंतर पशुपालन हा व्यवसाय केला जातो. गाय, बैल, शेळी, मेढी, म्हैस, इत्यादी. आहे. त्यामुळे शेतीला आवश्यक असणारे शेणखत त्यापासून मिळतात. त्यानंतर मासेमारी नदी, तलाव, धरण, नाले, ओढे या ठिकाणी मासेमारी करतांना दिसून येतात. खाणकाम हा देखील प्राथमिक व्यवसाय अंतर्गत येणारा व्यवसाय आहे. झरी जामणी या तालुक्यात तसेच वणी, मारेगव या तालुक्यात सर्वात जास्त खाणकाम करत असल्याचे लक्षात आले. त्यामध्ये प्रामुख्याने कोळसा खाणी सर्वात जास्त असून, चुना खाणी देखील त्या ठिकाणी आहे. हे सर्व प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसाय असून पर्यावरण आणि शाश्वत विकासच्या दृष्टीने अभ्यासणे काळाची गरज आहे.

**विषय विवेचन** – प्राथमिक व्यवसाय अंतर्गत येणारे व्यवसाय –

**शेती** – शेती करणारा शेतकारी असे आपण म्हणतो, यवतमाळ जिल्ह्यात शेती आणि शेतीवर काम करणारे कामगार मोठ्या प्रमाणात आहे. सध्याचा काळ बघितला आपण तर असे लक्षात येते की, शेतकाम करणाऱ्यांची संख्या झाली जास्त आणि शेती झाली कमी त्यामुळे बेरोजगार होण्याचे संकट निर्माण होते की काय असे झाले आहे. पण त्यावरही मात करणे गरजेचे ठरते.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

त्या अनुषंगाने विचार केला असता, तुकडा बंदी चा नियम शिथिल केला जाऊ शकते, आणि कमी शेतीत जास्त उत्पादन कसे घेऊ या साठी प्रयत्न करणे गरजेचे ठरते. २१ व्या शतकात अत्याधुनिक यंत्राचा वापर करून जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी प्रयत्नशील आहे. अशा परिस्थितीत उत्पादन वाढलेच पाहिजे पण मात्र अशा स्थितीत पर्यावरणाचा ऱ्हास व्हायला नको याची पूर्ण पणे काळजी घेणे महत्वाचे आहे. जेणे करून पुढील पीढीसाठी ते राहिले पाहिजे. यवतमाळ जिल्ह्यातील विविध तालुक्यात थोड्याफार फरकाचे पिके घेतली जातात. उदा. कापूस, तूर, उडीद, मुंग, ज्वारी, मका, गहू, सोयाबीन, इत्यादी. हे पिक घेत असतांना यावर कीटक नाशके, वर खते, वेगवेगळ्या प्रकारचे आणि जास्त प्रमाणात वापरतात त्यामुळे पिकांचे आणि जमिनीचे नुकसान होते तर जल प्रदूषित होते.

**पशुपालन –** दुध, मांस, अंडी. लोकर, किवा शेतीकामासाठी देखील उपयुक्त असणारे जनावरांचे शास्त्रीय पद्धतीने संगोपन, प्रजनन, काळजी आणि व्यवस्थापन करणे होय. प्राण्यांपासून ही महत्वाच्या आणि आवश्यक असणारे बाबींसाठी पशुपालन करणे देखील गरजेच आहे. पण त्यांना योग्यरित्या संगोपन करणे तितकेच गरजेचे आहे. त्यांच्यापासून मिळणारे व उपयोगी असणारे घटक लक्षात घेऊन तश्या प्रकारच्या प्राण्यांचे संगोपन केले जाते. उदा. गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी, कुकुट, इत्यादी. यवतमाळ जिल्ह्यात शेती व्यवसायाला पूरक म्हणूनही हा व्यवसाय केला जातो. ज्यांच्या कडे पूरक व्यवसाय असतात, त्यांची आर्थिक परिस्थिती देखील चांगली असते. असे दिसून आले.

**मासेमारी –** यवतमाळ जिल्ह्यात मासेमारी नदी, तलाव, धरण, नाले, ओढे अश्याच ठिकाणी करतांना आढळून आले असून त्यापासून भोई लोकांचे आर्थिक व्यवहार सुधारते. कोलम, परधान जमातींचे लोक हा व्यवसाय करतात. बाभूळगाव तहसील मधील बेंबळा धरण याचे उदाहरण आहे. म्हणजेच गोड्या पाण्यातील मासेमारींचे प्रमाण अधिक आहे. बेंबळा धरण मासेमारींचे प्रमुख केंद्र आहे. तसेच जिल्हाभरातील तलावांमध्ये मत्स्यसंवर्धन केले जाते. गोड्या पाण्यातील प्रमुख मासे जसे की, कटला, रोहू, मृगाल आणि तिलपिया यांचे संवर्धन केले जाते.

**खाणकाम –** शेती जसा प्रामुख्याने यवतमाळ जिल्ह्यात व्यवसाय केला जातो त्याचप्रमाणे खाणकाम देखील यवतमाळ च्या काही तालुक्यात प्रामुख्याने केला जातो. जसे झरी जामणी या तालुक्यात चिलाइ या ठिकाणी चुन्याच्या खाणी आहे. त्याचप्रमाणे वणी, मारेगाव या ठिकाणी कोळश्याच्या खाणी आहे. पृथ्वीच्या भूगर्भात अनेक धातू, खनिजे आहे. ज्याचा शोध लागला की, त्याचा वापर करण्यासाठी जमिनीच्या पोटातून धातू, खनिज इतर काही घटक बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करतात. त्यासाठी खाणकाम केले जातात. हा व्यवसाय देखील यवतमाळ जिल्ह्याच्या काही तालुक्यात मोठ्याप्रमंत केला जातो. त्यामुळे पर्यावरण बिघडण्याचे जास्त संधी आहे. असे होऊ नये म्हणून काही बाबी महत्वाच्या ठरतात. ते म्हणजे खाणकाम केले की, डम्पिंग करणे त्यानंतर त्यावर वृक्षां रोपण करणे गरजेचे असते.

**शैक्षणिक दृष्ट्या –** प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक वर्गांपर्यंत प्राथमिक व्यवसाय, पर्यावरण, या संदर्भात माहितीच्या स्वरुपात प्राप्त आहे. पण याही पुढे जाऊन ते ज्या प्रमाणात माहितीच्या स्वरुपात प्राप्त आहे त्या प्रमाणात प्रत्याक्षिक ही व्हावे जेणे करून कौशल्य आधारित शिक्षण दिल्याने शिक्षणात रुची, वाढून शिक्षण पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असतील; अश्या प्रकारचे ज्ञान मिळाल्याने पर्यावरण आणि शाश्वत विकास चांगल्या प्रकारे होईल.

**पर्यावरण –** पर्यावरण म्हणजे काय तर पृथ्वीवरील कोणत्याही प्रदेशातील मानव तसेच सजीव ज्या परिसरात राहतात, त्या परिसरातील सर्व घटक समूह मिळून तयार झालेली परिस्थिती होय. तर हेच परिस्थिती यवतमाळ जिल्ह्याची बघितली तर यवतमाळ जिल्हा प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या तालुक्यांची संख्या अधिक आहे. या जिल्ह्यात ३० ते ३५ टक्के पेक्षा कमी द्वितीयक आणि तृतीयक व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या आहे. म्हणू इथे प्राथमिक व्यवसायात गुंतलेली लोकांचे प्रमाण सर्वात

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

जास्त आहे. यवतमाळ, वणी, पुसद हे तालुके जर का सोडले तर इतर तालुक्यात पर्यावरण चांगले आहे. थोड्या फार प्रमाणात प्रदूषित होते पण ते लवकरच सुधारते.

**शाश्वत विकास –** आपण प्राथमिक व्यवसाय करत असतांना पर्यावरणाल हानी न पोहचवता, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि गैरवापर न करणे म्हणजेच शाश्वत विकास होय असे म्हणता येईल. सामाजिक न्याय, समानता, आरोग्य आणि शिक्षण सुधारणे, आर्थिक वाढ जी शाश्वत आणि पर्यावरणास पूरक आहे. ज्यामुळे गरिबी दूर होऊन कामगार, शेतकरी अन्नधान्य उत्पादनात अग्रेसर राहून राहणी मान उंचावेल, जीवन जगण्याची पद्धती सोपी होईल.

थोडक्यात, पर्यावरणा चा ऱ्हास न करता दीर्घकालीन मानवी विकास साधने म्हणजेच शाश्वत विकास होय.

## परिणाम –

प्राथमिक व्यवसाय यवतमाळ जिल्ह्यात अधिक प्रमाणात आहे, परिणामी इतर व्यवासायाचे प्रमाण कमी आहे.

प्राथमिक व्यवसाय अधिक प्रमाणात असल्यामुळे, पर्यावरणावर फारसा परिणाम पडत नाही.

कीटक नाशके, वर खते, जास्त पाण्याचा वापर शेतीत होत असल्याने जल आणि जमीन दुषित होते.

## निष्कर्ष –

प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसायामुळे पर्यावरण आणि शाश्वत विकास होतो.

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, वणी, यवतमाळ सारख्या तालुक्यात पर्यावरण आणि शाश्वत विकासासाठी सेंद्रिय शेती, जलसंधारण, महिला सक्षमीकरण आणि वन संवर्धन यावर भर दिला जात आहे.

कोळसा खाणीत डम्पिंग, वृक्षा रोपण आणि संवर्धन करतात, त्यामुळे पर्यावरण संतुलित राहण्यास मदत होते.

प्राथमिक व्यवसायांतर्गत येणारे व्यवसायाचे माहिती अभ्यासक्रमात आहे.

## संदर्भ

मगर जयकुमार (२०२३), जीवसृष्टी आणि पर्यावरण.

District Census Handbook of Yavatmal District- 2011.

घारपुरे डॉ. विठठ्ल (२०१३), "आर्थिक भूगोल, पिंपळापुरे & कं.पब्लिशर्स, नागपूर.

इंटरनेट..

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985